मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# गुलाम योसेफाचा देव सन्मान करतो



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus

रूपान्तरकार: M. Maillot; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

योसेफाचा मालक, पोटीफर याने योसेफाला चुकून तुरुंगात टाकले होते. तुरुंगात योसेफ आज्ञाधारक आणि इतरांना मदत करणारा असा होता. तुरुंगातील कामे करण्यासाठी तुरुंगाधिकाऱ्याने योसेफावर विश्वास केला. परमेश्वर योसेफासंगती असल्यामुळे, सर्वांसाठी तुरुंग चांगले स्थळ बनले.



राजाचा प्रमुख रोटी भाजणारा आणि प्रमुख प्यालेबरदार हे तुरुंगात होते. एके दिवशी योसेफाने त्यांना, "तुम्ही इतके खिन्न का आहात?"



असे विचारले. "कोणीही आम्हांला आमच्या स्वप्नांचा अर्थ सांगू शकत नाही" असे त्या गोंधळात पडलेल्या पुरुषांनी सांगितले.



"देव देऊ शकतो!" योसेफ म्हणाला. "मला स्वप्ने सांगा."



योसेफाने प्रमुख प्यालेबरदारला सांगितले, तुझ्या स्वप्नाचा अर्थ असा आहे की, "येणाऱ्या तीन दिवसांत तूं राजाच्या मर्जीस येशील," "राजाकडे माझी आठवण कर व माझीही तुरुंगातून सुटका व्हावी म्हणून राजाकडे माझ्याविषयी विनंती कर."




प्रमुख रोटी भाजणाऱ्याला वाईट बातमी होती, योसेफाने त्याला सांगितले की, "तिन दिवसात तु मरशील." दोघांची स्वप्ने खरी ठरली.

परंतू एकेदिवशी राजा अडचणीत आला तोपर्यंत
प्यालेबरदार बाहेर गेल्यावर योसेफाला विसरुन गेला होता.
"मी स्वप्न पाहिले" असे तो ओरडला. त्याच्या
विद्वानांपैकी कोणीही त्याला त्याच्या
स्वप्नाचा अर्थ सांगू
शकत नव्हता.





तेव्हां त्या
प्यालेबरदारला तुरुंगातील
योसेफाची आठवण झाली.
त्याने त्याच्याविषयी
फारोला सांगितले.

फारोने लगेच योसेफाला बोलावणे पाठविले.
योसेफाने राजाला सांगितले की, "तुझे स्वप्न म्हणजे देवाकडून
एक संदेश आहे, मिसर देशात येणारी सात वर्षे सुकाळाची असतील
आणि त्यानंतर येणारी सात वर्षे भयंकर दुष्काळाची असतील."



"सुकाळाच्या सात वर्षात अन्न साठवून
ठेवण्याची योजना तयार कर," असा सल्ला
योसेफाने फारो राजाला दिला. "अन्यथा तुझे
लोक दुष्काळाच्या काळात भुकेने मरतील."
"देव तुझ्या बरोबर आहे,"
असे फारोने जाहिर केले.
"तु संपूर्ण मिसर देशाचा
कारभार सांभाळशील,
मी एकटाच तुझ्यापेक्षा
वरिष्ठ पदावर असेन."



सुकाळाची सात वर्षे आली. त्यानंतर दुष्काळाची सात वर्षे. मिसर देशात अन्नाची साठवण मोठ–मोठ्या गोदामात हुशारीने केली होती, मिसर देशाव्यतिरीक्त इतर सर्व भागात अन्नचा तुटवडा निर्माण होऊ लागला. दुर देशी योसेफाच्या मायभूमित, याकोबाच्या कुटुंबाची देखिल उपासमार होऊ लागली.



सर्व देशांतील लोक अन्न विकत घेण्यासाठी मिसर देशात गेले. "तुम्ही देखिल जायला पाहिजे," अशी याकोबाने त्याच्या मुलांना आज्ञा केली, "नाहीतर आपण उपासमारीने मरुन जाऊ." मिसरात येऊन पोहचल्यावर, याकोबाच्या मुलांनी अन्न विकत घेण्याची तयारी केली.



मिसर देशाच्या अधिपतीसमोर याकोबाच्या मुलांनी नमन केले. हा अधिपती म्हणजे त्यांचा भाऊ योसेफ आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही. परंतु योसेफाने मात्र त्यांना ओळखले होते. योसेफाला त्याच्या बालपणाच्या स्वप्नाची आठवण झाली. देवाने त्याला त्याच्या भावांपेक्षा थोर केले होते.



योसेफ फार हुशार होता. तो त्याच्या भावांशी कठोरपणे बोलला आणि त्याचा भाऊ शिमोन याला त्याने बंदि बनवून ठेऊन घेतले. त्याने असा आदेश दिला की, "अन्न सामग्री घ्या, आपल्या घरि जा, आणि तुमच्या सर्वात धाकट्या भावाला घेऊन परत या, म्हणजे मला कळेल की तुम्ही हेर नाही."



पुष्कळ वर्षांपुर्वी त्यांनी योसेफाला गुलाम म्हणून विकले त्याविषयी परमेश्वर त्यांना शिक्षा करित आहे असे त्यांना वाटले.



याकोब आणि त्याचे मुलगे गोंधळात पडले. "आमचे पैसे धान्यांसोबत परत केले होते आणि त्या अधिकाऱ्याने तर आता बेंजामिनला देखिल सोबत घेऊन येण्यास सांगितले होते." याकोब बेंजामिनला जाऊ देऊ शकत नव्हता. परंतु मिसरातून आणलेले धान्य लवकरच संपले. त्या भावांना मिसर देशात परत जावे लागले. बेंजामिन देखिल त्यांच्याबरोबर गेला.



योसेफाने जेंव्हा बेंजामिनला पाहिले तेंव्हा त्याने त्याच्या सेवकांना मोठ्या मेजवानीची तयारी करण्यास सांगितले. सर्व भावांना आमंत्रित करण्यात आले होते. "तुमचे वडील अजून जिवंत आणि सुखरुप आहेत का?" असे योसेफाने त्यांना विचारले. त्याच्या सर्व कुटुंबाला मिसर देशात कसे आणावे याविषयी कदाचित तो विचार करित असावा.



पुष्कळ वर्षांपूर्वी योसेफाच्या भावांनी जे पाप केले होते त्याविषयी त्यांना आता खरा पश्चाताप झाला आहे किंवा नाही हे देखिल योसेफ जाणून घेऊ इच्छित होता. मेजवानी झाल्यावर यासेफाने त्यांच्यावर चोरिचा आरोप लावला.



योसेफ त्यांना म्हणाला की, "याविषयी तुम्हांला शिक्षा व्हावी म्हणून मी आता बेंजामिनला माझा गुलाम म्हणून ठेऊन घेतो."

"स्वामी, याच्याऐवजी तुम्ही मला गुलाम ठेवावे," अशी यहुदाने विनंती केली. ज्या यहुदाने योसेफाला विकण्याचे सुचविले होते तो आता पुर्णपणे बदलला आहे हे योसेफाला कळून आले.



आता जास्त वेळ योसेफ त्याच्या
कुटुंबाविषयी असलेले प्रेम लपवून
ठेवू शकत नव्हता, त्याने सर्व मिसरी
लोकांना त्याच्या घरातून
बाहेर पाठविले. आणि
तो रडू लागला.





"ज्याला तुम्ही मिसरांत विकून दिले
तोच, मी तुमचा भाऊ योसेफ आहे."
त्याचे भाऊ अतिशय अचंबित झाले
होते तसेच ते फार
घाबरले होते म्हणून
त्यांच्या तोंडून काही
शब्द निघेना.

योसेफाने त्याच्या भावांना धिर दिला.



"या दुष्काळात तुमचे प्राण वाचावे म्हणून देवाने मला मिसर देशाचा अधिपती बनविले. जा, माझ्या वडीलांना घेऊन या. मी तुमची काळजी घेईन."



मिसर देशात याकोब आणि
योसेफ पुन्हा एकत्रित आले
आणि सर्व कुटुंब तेथे शांतित
आणि विपुलतेत राहिले.

# गुलाम योसेफाचा देव सन्मान करतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

उत्पत्ति ३९-४५

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16